पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम ता.जि.वाशिम - 444505
दुरध्वनी क्रमांक : 07252-232134
ई-मेल- sp.washim@mahapolice.gov.in

# प्रेस नोट

07/2021

दिनांक 04.12.2021

## 6 डिसेंबर/महापरिनिर्वाण दिन निमीत्त जिल्हास्तरीय शांतता समितीची बैठक आयोजीत

6 डिसेंबर हा दिवस भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'महापरिनिर्वाण दिन' म्हणुन पाळण्यात येतो तसेच 1992 साली आयोध्या (उ.प्र.) येथील बाबरी मस्जिद च्या घटनेसंदर्भाने मुस्लीम संघटनांकडुन 'काळा दिवस' व हिंदु संघटनांकडुन 'विजय दिवस' म्हणुन आयोजीत करण्यात येतो. या अनुषंगाने मा. पोलीस अधिक्षक वाशिम यांचे मार्गदर्शनात दि. 03.12.2021 रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम येथे 6 डिसेंबर/महापरिनिर्वाण दिनानिमीत्त जिल्हा स्तरीय शांतता समिती ची बैठक घेण्यात आली . बैठकीमध्ये सर्व समाजातील एकुण 33 प्रतिष्ठीत सदस्य सहभागी झाले होते. 'महापरिनिर्वाण दिन' हा भारतीयांसाठी दुःखाचा, गांभीर्याने पालन करावयाचा असुन परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. त्यामुळे ओमिक्रॉन या कोरोना विषाणुच्या प्रजातीमुळे संसर्गाचा वाढलेला धोका लक्षात घेता महापरिनिर्वाण दिन सर्व अनुयायांनी साध्या पध्दतीने एकत्र न येता आयोजीत करावा. राज्य शासनाने चैत्यभूमी येथील कार्यक्रमाचे दुरदर्शनव्दारे थेट प्रक्षेपण करण्याची व्यवस्था केली आहे त्यामुळे अनुयायांनी चैत्यभूमी, दादर मुंबई येथे न जाता घरी राहुनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करावे. अशा प्रकारच्या शासनाच्या सुचना असुन त्या सर्व नागरीकांपर्यंत पोचविण्याचे सदस्यांना आवाहन करण्यात आले.

शासनाच्या सुचनांना अनुसरुन मा. जिल्हाधिकारी वाशिम यांनी काढलेल्या आदेशाचे तंतोतंत अनुपालन होईल याची सर्व अनुयायांनी खबरदारी घ्यावी. मा. जिल्हाधिकारी यांचे आदेशाचे उल्लंघन झाल्यास कलम 188 भादंवि व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-2005 अंतर्गत होणाऱ्या कायदेशीर कार्यवाही बाबत अवगत करण्यात आले. त्याबाबत जनजागृती करण्याच्या सुचना सदस्यांना देण्यात आल्यात.

सार्वजनीक शांततेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारची महत्वाची माहीती असल्यास 100/112 या क्रमांकावर कॉल करुन कळविण्यात यावे असे आवाहन करण्यात आले.

[डॉ.सी. खंडेराव]
पोलीस निरीक्षक, जिविशा
पोलीस अधिक्षक, वाशिम करीता